असा. क्र. १८

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, एप्रिल २०, २००५/चैत्र ३०, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.**—राजकोषीय व्यवस्थापनाची पिढ्यांतर्गत समन्यायता सुनिश्चित करणे, महसुली आधिक्य गाठणे, दूरदर्शी कर्ज व्यवस्थापन अंमलात आणून त्याच्याशी सुसंगत राजकोषीय स्थैर्य गाठणे, राज्य शासनाच्या आर्थिक व्यवहारात अधिकाधिक पारदर्शकता आणणे, मध्यम मुदत चौकटीमध्ये राजकोषीय धोरण राबविणे यांबाबत राज्य शासनाची जबाबदारी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबी यांसाठी अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. | २४९-२५४ |

दिनांक २० एप्रिल २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २० एप्रिल २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**राजकोषीय व्यवस्थापनाची पिढ्यांतर्गत समन्यायता सुनिश्चित करणे, महसुली आधिक्य गाठणे, दूरदर्शी कर्ज व्यवस्थापन अंमलात आणून त्याच्याशी सुसंगत राजकोषीय स्थैर्य गाठणे, राज्य शासनाच्या आर्थिक व्यवहारात अधिकाधिक पारदर्शकता आणणे, मध्यम मुदत चौकटीमध्ये राजकोषीय धोरण राबविणे यांबाबत राज्य शासनाची जबाबदारी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबी यांसाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन याबाबत विशेष कायदा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिसूचित करील अशा दिनांकापासून अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, अन्यथा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अर्थसंकल्प " याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०२ अन्वये राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडावयाचे वार्षिक वित्तीय विवरणपत्र, असा आहे ;

(ख) " वित्तीय वर्ष " याचा अर्थ, दिनांक १ एप्रिल रोजी सुरू होणारे आणि त्यालगतच्या पुढील वर्षाच्या ३१ मार्च रोजी समाप्त होणारे वर्ष, असा आहे ;

(ग) " राजकोषीय तूट " याचा अर्थ, ऋणेतर महसुलापेक्षा शासनाच्या एकूण खर्चाचे आधिक्य, असा असून त्यानुसार ती वर्षभरातील निव्वळ परतफेड सोडून अशा कर्जाची गरज दर्शविते, ज्यात व्याज व मुद्दल याद्वारे प्रदान करण्याचे दायित्व राज्य शासनावर आहे ;

(घ) " राजकोषीय निर्देशक " याचा अर्थ, राज्य शासनाच्या राजकोषीय स्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी विहित करता येईल असे सांख्यिकीय निर्देशक असा आहे ;

(ङ) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे ;

(छ) " महसुली तूट " याचा अर्थ, एकूण महसुली खर्च आणि एकूण महसुली जमा यांमधील फरक, असा आहे ;

(ज) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेले नियम, असा आहे ;

(झ) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(ञ) " एकूण दायित्वे " याचा अर्थ, राज्याचा एकत्रित निधी आणि राज्याचे सार्वजनिक लेखा, यानुसार येणारी दायित्वे, असा आहे.

## प्रकरण दोन

## अर्थसंकल्पीय पारदर्शकता

राज्य विधानमंडळासमोर मांडावयाचे राजकोषीय धोरण विवरणपत्र.

**३.** (१) राज्य शासन, प्रत्येक वित्तीय वर्षात, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे वार्षिक आर्थिक विवरणपत्र आणि अनुदानविषयक मागण्या यांसह पुढील राजकोषीय-धोरण-विवरणपत्रे सादर करील :—

(क) मध्यम मुदतीचे राजकोषीय-धोरण-विवरणपत्र,

(ख) राजकोषीय-धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र.

(२) मध्यम मुदतीच्या राजकोषीय-धोरण-विवरणपत्राद्वारे, विहित राजकोषीय निर्देशक आणि त्याची आधारभूत गृहितके विनिर्दिष्ट करून, तीन वर्षे चालू राहणारे उद्दिष्ट नेमून दिले जाईल.

(३) विशेषत: आणि पोट-कलम (२) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना बाध न आणता, मध्यम मुदतीच्या राजकोषीय-धोरण-विवरणपत्रात स्थैर्यनिर्धारणेबाबतच्या पुढील मुद्यांचा समावेश असेल,—

(एक) महसुली जमा आणि महसुली खर्च यांमधील समतोल ;

(दोन) उत्पादक मत्ता निर्माण करण्यासाठी भांडवली जमांचा वापर.

(४) राजकोषीय-धोरण-व्यूहरचना विवरणपत्रामध्ये इतर गोष्टींबरोबरच, पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल,—

(क) कराधान, खर्च, कर्जे आणि इतर दायित्वे, देणी आणि गुंतवणुका, अर्थसंकल्पीय आणि अर्थव्यवहार यांवर परिणाम करू शकणारे हमी आणि हमीदारी यासारखे इतर व्यवहार यासंबंधात, आगामी वित्तीय वर्षासाठीची राज्य शासनाची धोरणे ;

(ख) राज्य शासनाचे, राजकोषीय क्षेत्रातील आगामी वित्तीय वर्षासाठीचे व्यूहरचनात्मक अग्रक्रम ;

(ग) कराधान व खर्च यांच्या संबंधात राजकोषीय धोरणांमध्ये कोणतेही मूलभूत फरक असल्यास, त्यांबाबतच्या कारणमीमांसा आणि महत्वाच्या आर्थिक उपाययोजना ;

(घ) कलम ५ मध्ये मांडलेल्या राजकोषीय व्यवस्थापन तत्त्वांशी आणि मध्यम मुदत राजकोषीय धोरण-विवरणपत्रामध्ये मांडलेल्या उद्दिष्टांशी राज्य शासनाची विद्यमान धोरणे कशी सुसंगत आहेत याचे मूल्यांकन करणे.

(५) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेले मध्यम मुदत राजकोषीय-धोरण-विवरणपत्र आणि राजकोषीय धोरण-व्यूहरचना-विवरणपत्र, हे विहित करण्यात येईल अशा स्वरूपात असेल.

प्रगटीकरण.

४. (१) राज्य शासन, लोक हिताच्या दृष्टीने, त्यांच्या राजकोषीय व्यवहारांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, राज्य शासन, वार्षिक वित्तीय विवरणपत्र आणि अनुदान मागण्या सादर करताना प्रगटीकरण विहित स्वरुपात करील.

## प्रकरण तीन

## राजकोषीय व्यवस्थापनाची तत्त्वे

राजकोषीय व्यवस्थापनाची तत्त्वे.

५. (१) राज्य शासन, ३१ मार्च, २००९ पर्यंत महसुली तूट पूर्णपणे दूर करण्यासाठी यथोचित उपाययोजना करील आणि त्यानंतर प्रत्येक वर्षा अखेरीस महसुली आधिक्याचे संतुलन कायम राखील.

(२) राज्य शासन, नियमांद्वारे, राजकोषीय तूट दूर करण्यासाठी उद्दिष्टे विहित करील. या प्रयोजनासाठी, राजकोषीय तुटीच्या उद्दिष्टांचा अन्वयार्थ, महसुली जमेच्या प्रमाणात व्याजावरील खर्चाशी लावण्यात येईल :

परंतु, नैसर्गिक आपत्ती किंवा जी राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशी एक किंवा अनेक अपवादात्मक कारणे, यांमुळे महसुली तुटीचे आणि राजकोषीय तूट दूर करण्याचे उद्दिष्ट गाठता आले नाही तर, अशा उद्दिष्टांची मर्यादा वाढवता येईल :

परंतु आणखी असे की, उपरोक्त उद्दिष्टांतील अशा तुटीच्या रकमेत वाढ झाल्यास, पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेले कारण किंवा कारणे यांच्या संबंधातील निवेदन, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.

## प्रकरण चार

## अनुपालन करणे भाग पाडण्यासाठी उपाययोजना

अनुपालन करणे भाग पाडण्यासाठी उपाययोजना.

६. (१) वित्त विभागाचे प्रभारी मंत्री, अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा आणि खर्च यांचा कल कसा आहे याचा दर तीन महिन्यांनी आढावा घेतील आणि अशा आढाव्याचे निष्कर्ष, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवतील.

(२) जेव्हा पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या आढाव्यात राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनाविषयक विवरणपत्रात किंवा नियमांमध्ये उल्लेखिलेल्या पूर्व-विनिर्दिष्ट पातळीहून महसुली उत्पन्नात तूट असेल किंवा खर्च जास्त होत असेल तर, राज्य शासन, महसुलात वाढ करण्यासाठी आणि/किंवा खर्च कमी करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करील. त्यामध्ये, अशा रकमांच्या विनियोजनासाठी तरतूद करण्यासाठी, कोणत्याही कायद्यान्वये राज्याच्या एकत्रीकृत निधीतून द्यावयाच्या आणि उपयोजित करावयाच्या.अधिकृत रकमा कमी करणे, या बाबींचा समावेश होतो :

परंतु, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०२ च्या खंड (३) अन्वये एकत्रीकृत निधीवरील भारित खर्चास किंवा कोणत्याही करारान्वये किंवा कंत्राटान्वये खर्च करावयाची आवश्यकता आहे अशा इतर कोणत्याही खर्चास किंवा पुढे ढकलला जाऊ शकत नाही किंवा कमी केला जाऊ शकत नाही, अशा इतर कोणत्याही खर्चास या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

(३) (क) कलम ५ च्या पोट-कलम (२) मधील पहिल्या परंतुकान्वये तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमान्वये राज्य शासनावर असणारी दायित्वे निभावताना, कोणत्याही विचलनास (deviation) राज्य विधानमंडळाच्या मान्यतेशिवाय परवानगी दिली जाणार नाही.

(ख) जेथे अनपेक्षित परिस्थितीमुळे, या अधिनियमान्वये राज्य शासनावर असणारी दायित्वे निभावताना विचलन केले असल्यास, वित्त विभागाच्या प्रभारी मंत्र्यास राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पुढील बाबींचे स्पष्टीकरण करणारे निवेदन करावे लागेल,—

(एक) या अधिनियमान्वये राज्य शासनावर असणारी दायित्वे निभावताना केलेले कोणतेही विचलन ;

(दोन) असे विचलन मोठ्या प्रमाणात आणि प्रत्यक्ष किंवा संभाव्य अर्थसंकल्पीय निष्पत्तिशी संबंधित आहे किंवा कसे ; आणि

(तीन) राज्य शासनाने करावयाच्या प्रस्तावित सुधारात्मक उपाययोजना.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

७. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचे अधिकार.

(२) विशेषतः करून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल :—

(क) कलम २ च्या खंड (घ) च्या प्रयोजनासाठी विहित करावयाचे राजकोषीय निर्देशक ;

(ख) कलम ३ च्या पोट-कलम (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण-विवरणपत्राचे आणि राजकोषीय धोरण-व्यूहरचनाविषयक विवरणपत्राचे नमुने ;

(ग) प्रगटीकरण आणि कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्या स्वरूपात प्रगटीकरण करण्यात येतील असे नमुने ;

(घ) कलम ५ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट करावयाचे उद्दिष्ट ;

(ङ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

८. या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल, इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिती, तो अंमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही. राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर नियम सादर करणे.

९. या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, राज्य शासनाविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.

१०. या अधिनियमान्वये, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही कृतीच्या किंवा घेतलेल्या कोणत्याही निर्णयाच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित करण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयास असणार नाही. दिवाणी न्यायालयांची अधिकारिता नसणे.

११. या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या जोडीने असतील आणि त्या तरतुदींना कमीपणा आणणाऱ्या नसतील. इतर कायद्यांच्या प्रयुक्तीला आडकाठी नसणे.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. १२. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, परंतु या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसेल अशी, कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षे संपल्यानंतर या पोट-कलमाअन्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.